MHJG210011242025

# निशाणी ०५ खालील आदेश

(जयश्री खाचणे व इतर–१ **विरुध्द** चेतन खाचणे)

अर्जदार क्र. १ हिने भारतीय नागरीक सुरक्षा संहिता, २०२३ चे कलम १४४ अन्वये तिला स्वतःकरीता व अर्जदार क्र. २ करीता मासिक खावटी मिळणेसाठी सामनेवाला याच्या विरुध्द मुळ अर्ज दाखल केलेला असून, सदर अर्जामध्ये तिने सामनेवाला याच्याकडून अर्जदारांना अंतरिम खावटी मंजूर करण्यासाठी प्रस्तुत अर्ज दाखल केलेला आहे.

**०२.** अर्ज व त्यावर सामनेवाला याने निशाणी क्र. १५ प्रमाणे दाखल केलेले म्हणणे वाचले. अर्जदारांतर्फे निशाणी क्र. ०७ प्रमाणे व सामनेवालातर्फे निशाणी क्र. १९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेले मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रांचे अवलोकन केले. उभय पक्षकारांनी अभिलेखावर दाखल केलेल्या इतर कागदपत्रांचे देखील अवलोकन केले.

**०३.** अर्जदार व सामनेवाला यांच्या परस्परविरोधी कथनांवरुन खालील मुद्दे माझ्या विचारार्थ उपस्थित होतात, त्यावरील माझे निष्कर्ष, मी कारणमिमांसेसह खालील प्रमाणे नोंदवित आहे.

| **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|
| ०१. अर्जदार क्र. १ व २ हे सामनेवाला याच्याकडून अंतरिम खावटी मिळण्यास पात्र आहेत काय ? | ...होय. |
| ०२. आदेश काय ? | अंतिम आदेशाप्रमाणे. |

## कारणमिमांसा

**०४.** मी अर्जदारांच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. ए.आर. सुरळकर यांचा व सामनेवाला याच्या वतीने विद्वान विधीज्ञ श्री. आर.टी. राई यांचा युक्तीवाद श्रवण केला.

### मुद्दा क्र.१ करिताः

**०५.** याबाबत वाद नाही की, अर्जदार क्र. १ ही सामनेवाला याची कायदेशीर विधीवत लग्नाची पत्नी असुन अर्जदार क्र. २ हा त्यांच्या वैवाहिक संबंधातुन जन्माला आलेला मुलगा आहे.

**०६.** उभय पक्षकारांनी अर्ज व त्यावर दाखल केलेले म्हणणे यामध्ये परस्परविरोधी केलेले आरोप, प्रत्यारोप हे निश्चयात्मक व विश्वसनीय साक्षीपुरावा देऊन सिध्द करणे गरजेचे आहे. म्हणून, याक्षणी मी उभय पक्षकारांनी केलेल्या आरोप, प्रत्यारोपांच्या खोलात जाणार नाही. त्यामुळे,

प्रस्तुत अंतरिम खावटी मिळणेचा अर्ज निकाली काढण्यासाठी, उभय पक्षकारांच्या आर्थीक सामर्थ्याच्या हद्दीपावेतो मी स्वतःला सिमीत ठेवित आहे.

**०७.** अर्जदारांतर्फे युक्तीवाद करण्यात आला की, सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिचा शारीरिक व मानसिक छळ करुन अर्जदार क्र. २ सह घरातून हाकलून दिलेले आहे. अर्जदार क्र. १ हिस स्वतःचा उदरनिर्वाह करण्यासाठी आणि अर्जदार क्र. २ याचे पालनपोषण करुन त्याचा शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी पैशांची गरज भासते. तथापि, अर्जदार क्र. १ हिस उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. याउलट, सामनेवाला हा पुणे येथे कंपनीमध्ये नौकरीस असुन त्यास प्रतिमहा रक्कम रुपये ६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये साठ हजार मात्र) पगार मिळतो. त्यामुळे, तो अर्जदारांना अंतरिम खावटी देण्यास सक्षम आहे. करीता, अर्जदारांच्या वतीने प्रस्तुत अर्ज मंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०८.** याउलट, सामनेवालातर्फे युक्तीवाद करण्यात आला की, अर्जदार क्र. १ हिने प्रस्तुत अर्जामध्ये केलेले सर्व आरोप खोटे असुन सामनेवाला याने अर्जदार क्र. १ हिचा कधीही शारीरिक अथवा मानसिक छळ केलेला नाही. अर्जदार क्र. १ ही अर्जदार क्र. २ सह स्वईच्छेने तिच्या माहेरी राहत आहे. सामनेवाला हा टाटा टोयो रेडीएटर कंपनीमध्ये नौकरी करत असुन त्यास केवळ प्रतिमहा रक्कम रुपये ३०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये तीस हजार मात्र) पगार मिळतो. त्यामुळे, घरासाठी घेतलेला कर्जाचा हप्ता व इतर कपात वगळता सामनेवाला यास त्याच्या पगारातून केवळ प्रतिमहा रक्कम रुपये १२,८००/– (अक्षरी रक्कम रुपये बारा हजार आठशे मात्र) शिल्लक राहतात. सामनेवाला हा अर्जदार क्र. १ हिला नांदावयास घेऊन जाण्यास तयार होता व आहे. परंतू, अर्जदार क्र. १ ही सामनेवाला याच्यासोबत नांदण्यास तयार नाही. त्यामुळे, तिला सामनेवाला याच्याकडून खावटी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. करीता, सामनेवाला याच्या वतीने प्रस्तुत अर्ज नामंजूर करण्याची विनंती करण्यात आली.

**०९.** या ठिकाणी हे लक्षात घेणे आवश्यक आहे की, अर्जदार क्र.१ व सामनेवाला हे आपसात पती–पत्नी असून त्यांच्यातील नातेसंबंध अद्यापपावेतो अस्तित्वात आहे. तसेच, त्यांच्या नातेसंबंधातून अर्जदार क्र. २ हा त्यांना जन्माला आलेला मुलगा आहे. अर्जदार क्र. १ हिस तिची स्वतःची उपजिवीका भागविण्यासाठी व अर्जदार क्र. २ याचे पालनपोषण करण्यासाठी निश्चितपणे स्वतंत्र अशा पैशाची गरज भासत असणार याबाबत शंका नाही. अर्जदाराच्या कथनानुसार सामनेवाला हा पुणे येथे कंपनीमध्ये नौकरीस असुन त्यास प्रतिमहा रक्कम रुपये ६०,०००/– (अक्षरी रक्कम रुपये साठ हजार मात्र) पगार मिळतो. तथापि, अर्जदारांच्या वतीने त्याबाबत याक्षणी कोणताही ठोस असा कागदोपत्री पुरावा पटलावर दाखल केलेला नाही.

**१०.** याउलट, सामनेवाला याने निशाणी क्र. २३ वरील दस्त यादीप्रमाणे माहे जानेवारी, २०२६ ची पगार स्लीप अभिलेखावर दाखल केली असुन त्यानुसार त्याला सर्व कपात वजावट होता प्रतिमहा रक्कम रुपये २६,४२१/– (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस हजार चारशे एकवीस मात्र) पगार मिळत असल्याचे कळविले आहे.  त्याचप्रमाणे, त्याने निशाणी क्र. १९ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्व शपथपत्रामध्ये त्याचे शिक्षण अभियांत्रीकी नमूद केले आहे. मासिक पगार या रकान्यामध्ये केवळ लागु आहे असे नमूद केलेले आहे.  तथापि, त्याने त्यामध्ये त्याला पगार मिळत असल्याची रक्कम नमूद केलेली नाही.

**११.** सदर मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रामध्ये सामनेवाला याने त्याच्या वडीलांना देखील निवृत्तीवेतन मिळत असल्याचे नमूद केलेले आहे.  यावरुन सामनेवाला याच्याकडे निश्चितपणे उत्पन्नाचे पुरेसे साधन असुन त्याच्यावरती कुटूंबातील इतर सदस्यांच्या पालनपोषणाची जास्तीची जबाबदारी असल्याचे दिसून येत नाही.  याउलट, अर्जदार क्र. १ हिने निशाणी क्र. ०७ प्रमाणे अभिलेखावर दाखल केलेल्या मालमत्ता व दायित्व प्रतिज्ञापत्रावरुन तिला उत्पनाचे कोणतेही साधन असल्याचे दिसून येत नाही.

**१२.** सामनेवला याची पती व पिता या नात्याने अर्जदार क्र. १ व २ यांचा व्यवस्थित सांभाळ करण्याची नैतिक व कायदेशीर जबाबदारी असून सदर जबाबदारीपासून तो स्वत:ला दुर ठेवु शकत नाही.  सध्याच्या महागाईच्या काळात अत्यावश्यक वस्तुंच्या किंमती भरमसाठ वाढलेल्या आहेत.  म्हणून, अर्जदार क्र. १ हिच्या स्वतःच्या उदरनिर्वाहासाठी आणि अर्जदार क्र. २ याच्या पालनपोषणासाठी व त्याचा शैक्षणिक खर्च भागविण्यासाठी अर्जदार क्र. १ हिला पैशाची गरज भासत असणार याबाबत शंका नाही.  प्रस्तुत प्रकरणामध्ये उभय पक्षकारांचा साक्षीपुरावा होऊन प्रकरण गुणवत्तेवर अंतिमतः निर्गत होण्यास आणखी बराच अवधी जाणार आहे. त्यामुळे, उपरोक्त नमूद बाबींचा सारासार विचार करता अर्जदार क्र. १ व २ हे सामनेवाला याच्याकडून प्रस्तुत प्रकरणामध्ये अंतरिम खावटी मिळण्यास पात्र असल्याचे प्रथमदर्शनी सिध्द होते.

**१३.** अर्जदारांच्या मागणीनुसार अंतरिम खावटी मंजूर करण्यासाठी सामनेवाला याच्याकडे असलेल्या उत्पन्नाचा स्त्रोत आणि अर्जदारांची निकड विचारात घेणे गरजेचे आहे. उपरोक्त उल्लेखीत केल्याप्रमाणे सामनेवाला याने अभिलेखावर दाखल केलेल्या पगार स्लीपवरुन त्याला सर्व कपात वजावट होता प्रतिमहा रक्कम रुपये २६,४२१/– (अक्षरी रक्कम रुपये सव्वीस हजार चारशे एकवीस मात्र) पगार मिळत असल्याचे दिसून येते.  त्यामुळे, सर्व बाबींचा सारासार विचार करता, माझ्या मते अर्जदार क्र.१ हिस प्रतिमहा रक्कम रूपये ५,०००/– (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) आणि अर्जदार क्र. २ यास प्रतिमहा रक्कम रुपये २,५००/– (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार पाचशे मात्र) अंतरिम खावटी सामनेवाला याच्याकडून मंजूर करणे न्यायोचित होईल. सबब, मी मुद्दा क्र.१ चा

निष्कर्ष होकारार्थी नोंदवून, मुद्दा क्र.२ करिता, खालीलप्रमाणे आदेश पारीत करीत आहे.

## आदेश

**०१**. अर्ज नि.क्र. ०५ अंशतः मंजूर करण्यात येत आहे.

**०२**. सामनेवाला यास निर्देश देण्यात येते की, त्याने अर्जदार क्र. १ हिस प्रतिमहा रक्कम रूपये ५,०००/- (अक्षरी रक्कम रुपये पाच हजार मात्र) व अर्जदार क्र. २ यास प्रतिमहा रक्कम रूपये २,५००/- (अक्षरी रक्कम रुपये दोन हजार पाचशे मात्र) अंतरिम खावटी म्हणून प्रस्तुत अर्जाच्या दिनांकापासून मुळ अर्जाचा अंतिम निकाल लागेपावेतो द्यावेत.

**०३**. प्रस्तुत आदेशाची एक प्रत अर्जदार क्र. १ व संरक्षण अधिकारी यांना नियमाप्रमाणे मोफत देण्यात यावी.

**०४**. अर्जदार क्र. १ हिस निर्देश देण्यात येते की, प्रस्तुत आदेशाच्या अनुषंगाने अंतरिम खावटीची रक्कम सामनेवाला याचेकडून वसुल होऊन मिळणेसाठी तिने स्वंतत्र फौजदारी किरकोळ अर्ज दाखल करावा.

RAJNIKANT SHESHERAO JAGTAP
Digitally signed by RAJNIKANT SHESHERAO JAGTAP
Date: 2026.07.03 16:31:53 +0530

(रजनिकांत शे. जगताप)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
यावल.

दिनांकः- ०३/०७/२०२६